**प्रेस नोट <u>दिनांक ०२/०४/१९</u>**

**<u>वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>**

**<u>गहाळ झालेल्या पाकीटाच्या मालकाचा शोध घेऊन त्यास पाकीट परत केले</u>**

दि ०१/०४/१९ रोजी २०.३० वा चे सुमारास इसम नामे श्री. कालीदास दादू लोणारे वय ४४ वर्ष रा. न्यु कोपरे गाव, उत्तमनगर यांनी त्यांना मुंबई बेंगलोर हायवे सर्व्हिस रोडवर दुर्गा कॅफे समोर एक पाकीट मिळून आल्याने त्यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास हजर केले व कळविले की, मी झोमॅटो कंपनीत नोकरीस असून आज रोजी २०.०० वा चे सुमारास गि-हाईकाची ऑर्डर प्रमाणे माल घेणेकामी मुंबई बेंगलोर हायवे सर्व्हिस रोड वरील हैद्राबादी बिर्याणी हाऊस या हॉटेलवर येत असताना मला रस्त्यात हे पाकीट पडल्याचे दिसले म्हणून मी ते हजर करीत आहे. सदर पाकीटा मध्ये पाहणी केली असता, पाकीटात पॅन कार्ड, २ डेबिट कार्ड, २ क्रेडिट कार्ड व रोख रू २००/- होते. परंतु पाकीटाच्या मालकाचे व्हिजिटींग कार्ड अगर मोबाईल नंबर मिळून आला नाही. सदरचे पाकीट ठाणे अंमलदार पो.उप-निरी. श्री. अशोक येवले यांनी ताब्यात घेऊन पाकीटाच्या मालकाचा शोध घेऊन तुम्हाला कळवितो व बोलावून घेतो असे श्री लोणारे यांना कळविले.

आज रोजी पाकीटात मिळून आलेल्या एटीएम कार्डाची माहिती संबधीत बँकेला कळवून एटीएम कार्ड धारकाचे नाव पत्ता देणेबाबत विनंती केली असता, बँकेकडून एटीम कार्ड धारकाचे नाव श्री साकेत देशमुख असे असल्याचे कळवून त्यांचा मोबाईल नंबर दिला. सदर मोबाईल नंबरवर संपर्क साधून चौकशी केली असता, श्री साकेत देशमुख यांचे पाकीट हरविले असलेबाबत माहिती प्राप्त झाल्याने त्यांना व पाकीट हजर करणारे श्री लोणारे यांना वारजे माळवाडी पोलीस ठाण्यास बोलावून घेतले व खात्री करून श्री देशमुख यांना श्री लोणारे यांचे समक्ष पाकीट ताब्यात दिले. श्री. देशमुख यांनी त्यांना रोख रक्कम बक्षिस म्हणून देऊ केली असता, श्री लोणारे यांनी सापडलेले पाकीट परत देणे ही त्यांची सामाजिक बांधिलकी असल्याचे सांगून बक्षिस रक्कम घेण्यास नम्रपणे नकार दिला. सरते शेवटी श्री लोणारे यांना पोलीस ठाण्या मार्फत पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.


वारजे माळवाडी पोलीस ठाणे
महाराष्ट्र पोलीस
पुणे शहर
०२०-२५२३७७७७